नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या., नागपूर (नोंदणी रद्द) उमरोड रोड, जि. नागपूर या सूतगिरणीच्या ११२४ कामगारांना रु.१०.०० कोटी इतके सानुग्रह अनुदान मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः बैठक-१५१५/प्र.क्र.५६/टेक्स-१ (अ)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
तारीख : १९ ऑगस्ट, २०१९

वाचा :-
१. शासन निर्णय समक्रमांक दि.२२.०६.२०१८.
२. शासन पत्र समक्रमांक दि.२३.०८.२०१८.
३. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे पत्र जा.क्र. कार्या-६(२)/सूतगि/११२२७/१८, दि.३०.११.२०१८.
४. शासन निर्णय समक्रमांक दि.०५.०३.२०१९.

प्रस्तावना :-

वाचा क्र.४ येथील शासन निर्णयान्वये नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या., नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या २०.२० एकर जमिन रेडी रेकनर दराने म्हाडाला विक्री करून या विक्रीतून येणा-या रक्कमेमधून नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या, नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या एकूण ११२४ कामगारांना प्रति कामगार रु.८८९६८/- (अक्षरी रुपये अठ्याअंशी हजार नऊशे अडुसष्ट फक्त) इतके असे एकूण रु.१०.०० कोटी इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. सदरील सानुग्रह अनुदान हे पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात आले होते -

"नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या, नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या ११२४ कामगारांना सदरील सानुग्रह अनुदान देण्यापूर्वी यापुढे कामगार व कामगार संघटना कोणत्याही रक्कमेची मागणी कारणार नाही किंवा याबाबत मा. न्यायालयात कोणतीही याचिका/ अर्ज दाखल करणार नाही, अशाप्रकारचे बंधपत्र संबंधित कामगारांकडून घेण्यात यावे. तसेच याबाबत वेगवेगळ्या मा.न्यायालयात प्रकरणे दाखल/ प्रलंबित असल्यास ती कामगारांनी तथा कामगार संघटनांनी प्रथम मागे घ्यावीत व नंतरच रक्कम अदा करण्यात यावी"

दि.०५.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील उपरोक्त नमूद अट क्र. २ रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

दि.०५.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील अट क्र. २ रद्द करण्यास शासन मान्यता देण्यात येत असून वरील दि.०५.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील नमूद रु.१०.०० कोटी इतकी रक्कम नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या., नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या ११२४ कामगारांना सानुग्रह अनुदान म्हणून देण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र, यानंतर ह्या ११२४ कामगारांना कोणतेही न्यायालयीन प्रकरण दाखल करता येणार नाही व सदरील कालावधीच्या वेतन, भत्ते, व्याज, इ. ची मागणी करता येणार नाही. तसेच ह्या ११२४ कामगारांनी सदरचे सानुग्रह अनुदान स्वीकारल्यानंतर कोणतेही वेतन/ भत्ते देय राहणार नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१९१४४२४२८३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishal Vishvas Madane

Digitally signed by Vishal Vishvas Madane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co Operation Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bb0ed28a897fc87f69fe8807b3d9428966ce3233edb83a20c38834c19f2e3793, serialNumber=cb16db1cc002e115b709a8ca348a6483883493aaf53b7be25836cda1b57ff2dc, cn=Vishal Vishvas Madane
Date: 2019.08.20 05:17:35 +05'30'

(विशाल मदने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. आयुक्त, वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर.
१०. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, नागपूर.
१२. अवसायक, नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी, नागपूर, उमरोड रोड,नागपूर.
१३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., वकील हाऊस, मुंबई.
१४. निवडनस्ती (टेक्स १-अ/टेक्स १-ब).